# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड    जा.क्र. ३६७/२०१९    दिनांक  २५/१०/२०१९**

**१)लोहा :-** दिनांक २४.१०.२०१९ रोजी चे १७.४५ वा. चे सुमारास, सुनेगाव जाणारे रोडवर बळीराजा हॉटेल समोर ता. लोहा जि.नांदेड येथे, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिर रित्या देशी दारु भिंगरी संत्रा किंमती १६६४/- रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने स्वतःच्या ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/८५२ बालभारती कैलासभारती, ने. पोस्टे लोहा** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पोस्टे लोहा** गुरन १४२/२०१९ कलम ६५ (ई), महाराष्ट्र प्रो.कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोहेकॉ/८५२ भारती, मो.नं. ९२८४२५४४२७** हे करित आहेत.

**२)मुक्रामाबाद :-** दिनांक २२.१०.२०१९ चे १६.०० वा. चे सुमारास, बिहारीपुर गावाजवळील लेंडी नदीचे पात्रात ता. मुखेड जि. नांदेड येथे, यातील **मयत नामे हाणमंत लक्ष्मण बडगणे, वय २७ वर्षे, रा. रावी ता. मुखेड** हा मो.सा. बसुन त्याची सासुरवाडी विठ्ठलवाडी ता. गंगाखेड जि. परभणी येथे जात असताना बिहारीपुर लेंडी नदीचे कच्या पुलावरुन जात असताना नदीच्या पाण्याचा प्रवाह अचानक वाढल्याने मो. सा. सह पाण्यात वाहुन जावुन मरण पावला आहे. वगैरे **खबर देणार गुणवंत लक्ष्मण बडगणे, वय ३० वर्षे, व्यवसाय शेती रा. रावी ता. मुखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पोस्टे मुक्रामाबाद** आ.मृ. १८/२०१९ कलम १७४ सिआरपीसी प्रमाणे आ.मृ. दाखल असुन **तपास पोहेकॉ/१९९६ आडेकर, मो.क्र. ९८२३२१२५३३** हे करीत आहेत.

**३)कुंटूर :-** दिनांक २२.१०.२०१९ चे २२.०० ते दि. २४.१०.२०१९ चे ०७.०० चे दरम्यान, दत्ता जाधव याचे शेताजवळील आडात (विहीर)मौ. कुष्णुर ता. नायगाव जि. नांदेड येथे, यातील **मयत नामे चंद्रकांत मारोती भालेराव, वय ४० वर्षे, रा. कुष्णुर** हा आडात (विहीरीत ) पडुन पाण्यात बुडून मरण पावला **खबर देणार राघोबा ऊर्फ सचीन गणपती वाघमारे, वय ३० वर्षे, रा. कुष्णूर ता. नायगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पोस्टे कुंटूर** आ.मृ. ३०/२०१९ कलम १७४ सिआरपीसी प्रमाणे आ.मृ. दाखल असुन **तपास पोहेकॉ/११८१ कुमरे, मो.क्र. ८२०८७८८३२४** हे करीत आहेत.

**४)कुंटूर:-** दिनांक २१.१०.२०१९ चे ०९.५२ वा. चे सुमारास, मौ. हंगरगा ता. नायगाव जि. नांदेड येथे, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या भाजपाचे उमेदवार व पक्षाचे चिन्ह कमळाचा प्रचार करुन आदेर्श आचार संहितेचा भंग केला. **फिर्यादी माधव नामदेव केंद्रे, वय ५७ वर्षे, व्यवसाय गटविकास अधिकारी रा. नागेश नगर तरोडा (बु) नांदेड** यांचे फिर्यादी वरुन **पोस्टे कुंटूर** गुरनं ५९/२०१९. कलम १७१(जी), भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/१५९२ निकम , मो. नं. ९१५८९११५९२** हे करीत आहेत.

**५) मुखेड :-** दिनांक २३.१०.२०१९ रोजी चे १९.०० वा. चे सुमारास, होकर्ना पाटीजवळ मुखेड जि. नांदेड येथे, यातील फिर्यादी हा त्याचा ॲटो घेऊन मुखेड कडे जात असतांना वाटेत ऊभा केलेला मोटार सायकलला धक्का लागुन खाली पडल्याने आरोपीने फिर्यादीस शिवीगाळ करुन लोखंडी रॉडने फिर्यादीचे डाव्या पयाचे फेंड्रीवर मारुन फॅक्टचर केले. वगैरे **फिर्यादी माधव पी. शेषेराव पाटील, वय ३० वर्षे, रा. खतगाव ता. मुखेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरनं ३२४/२०१९ कलम ३२५, ५०४ भादंवि कायदया प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोनि/मगरे, मो.क्र. ८६०५२५२५५५** हे करीत आहेत.

**६)हिमायतनगर :-** दिनांक २४.१०.२०१९ रोजी चे १५.०० वा.चे सुमारास, जुन्ने तहसील समोर रोडवर हिमायतनगर जि. नांदेड येथे, यातील **मयत नामे महमद जाहेद पि. अब्दुल अजीज, वय १९ वर्षे, रा. हिमायतनगर जि.नांदेड** हा पायी जात असल्याने यातील ट्रक क्रमांक एम.एच.-२४/जे-५७५० चे चालकाने आपले वाहन हयगयीने चालवुन यातील मयतास पाठीमागुन धडक देवुन त्यांचे मरणास कारणीभुत झाला. वगैरे **फिर्यादी अब्दुल अजीज पि. अब्दुल रहेमान, वय ४२ वर्षे, व्यवसाय मजुरी रा. रहेम कॉलनी हिमायतनगर जि.नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरनं १८६/२०१९ कलम २७९, ३०४(अ), भादंवि कायद्या प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोनि/ईंगळे, मो.नं. ९८२३२९१०९२** हे करीत आहेत.

**७)माळाकोळी :-** दिनांक ०४.०६.२०१९ रोजी चे वेळ नक्की नाही, लातुर ते नांदेड जानारे रोडवर माळाकोळी, जि. नांदेड येथे, यातील फिर्यादीने त्याचा ट्रक क्रमांक एम.एच.-२६/एच-५९४२ ही विश्वासाने आरोपीचे ताब्यात दिली असता यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करुन सदर ट्रकचा नंबर प्लेट व कलर बदलुन गाडी स्वतः वापरुन फिर्यादीचा विश्वासघात करुन फसवणुक केली. वगैरे वरुन मा. कोर्टाचे ओदशान्वये १५६(३) सिआरपीसी प्रामणे गुन्हा दाखल **फिर्यादी शिवाजी बळीराम पवार, वय ४६ वर्षे, व्यवसाय व्यापार, रा. पिंपळगाव तांडा ता. मुदखेड जि. नांदेड ह. मु. चाकन शिकरापुर रोडवर शेली पिंपळगाव ता. राजगुरु नगर जि. पुणे** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पोस्टे माळाकोळी** गुरन. १६८/२०१९ कलम ४२०, ४०६, ३४, भादवि कायदा नुसार गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/गिते, मो.क्र. ९०९६६९१८४८** हे करीत आहेत.

**८)हिमायतनगर :-** दिनांक २३.१०.२०१९ रोजी चे १८.०० ते दि. २४.१०.२०१९ रोजी चे ०५.०० वा. चे दरम्यान, दिगांबर उगीरवाड यांचे आखाडयावर शेल्लोडा शिवार ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे, यातील फिर्यादीने त्यांचे दोन म्हशी व एक वगार हे शेतातील आखाडयावर बांधुन घरी आले व सकाळी जावुन पाहिले असता कोणीतरी आज्ञात चोरटयांने आखाडयावरील म्हशी किंमती १,०३,०००/-रुपयाचे चोरुन नेल्या. वगैरे **फिर्यादी दिगांबर विश्वनाथ उगीरवाड, वय ४५ वर्षे, व्यवसाय शेती रा. शिल्लोड ता. हिमायतनगर जि. नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरनं १८५/२०१९ कलम ३७९, भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/१७९५ ठाकरे, मो.नं. ९४२१७६१३०९** हे करीत आहेत.

**९)शिवाजीनगर :-** दिनांक २२.१०.२०१९ रोजी चे २४.०० ते ०५.०० वा. चे दरम्यान, वसंतनगर चौक नांदेड येथे, यातील फिर्यादीने त्याची पानपट्टी बंद करुन घरी गेला असता यातील नमुद आरोपीतांनी फिर्यादीचे पानपट्टीचे कडी कोंडा, कुलूप तोडुन आतील सिगारेट, सुगंधीपुडे, होमथेअटर, भिंतीवरचे घडयाळ असे एकुण २३,७३०/-रु चा माल चोरुन नेले. वगैर **फिर्यादी संतोष पि. भगवानराव अन्नपुर्णे, वय ३२ वर्षे, व्यवसाय व्यापार रा. आंबेडकरनगर नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं. ३३६/२०१९ कलम ४६१, ३८० भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोहेकॉ/३१८ घुगे, मो.नं. ९२८४८४८९९४** हे करीत आहे.

**१०)भोकर :-** दिनांक २२.१०.२०१९ रोजी चे १४.१५ वा. चे सुमारास, मौ. धानोरा ता. भोकर जि.नांदेड येथे, यातील **मयत नामे शामसुंदर बालाजी दांगड, वय २३ वर्षे, रा. धानोरा ता. भोकर** यास यातील नमुद आरोपीने माझे ५०/-रु दे अशी मागणी केली असता यातील मयताने माझे गॉगल दे तेंव्हा तुझे ५०/-रु परत देतो असे म्हणल्याने आरोपीने त्याचा हात धरुन दुसरा हात गळयात टाकला असता यातील मयताने सुटकेसाठी प्रयत्न केला असता आरोपीने धक्का दिल्याने तो पाटीवर सिमेंट रस्त्यावर पडला त्याचे डोक्यास गंभीर मार लागला असता त्यास उपचार कामी दवाखान्यात नेत असतांना रस्त्यात मरण पावला आरोपीने मयताचा खुन केला. वगैरे **फिर्यादी संदीप श्रीराम लांबगे, वय २८ वर्षे, व्यवसाय धंदा शेती रा. धानोरा ता. भोकर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरनं ३४१/२०१९ कलम ३०२ भादंवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोनि/एस.व्ही.भाले मो.क्र. ९५४५०४९९७७** हे करीत आहेत.

**(अण्णासाहेब पवार)**
सपोनि तथा जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड
फोन नंबर ०२४६२-२४४४७४